# P18/AGR224/EE/20160309

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

---

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप-प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) जनावरांच्या आजारांचे वर्गीकरण सविस्तर लिहा. 5

ब) कोंबड्यांना लसीकरण करताना कोणती काळजी घ्यावी ते लिहा. 5

क) शेळ्यांच्या देशी जातीची माहिती लिहा. 5

ड) रोपवाटिका यशस्वी होण्यासाठी कोणत्या नियमांचे पालन करावे ते लिहा. 5

इ) भात शेतातील मत्स्यसंवर्धनाचे फायदे लिहा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) कंपोस्ट खत तयार करण्याच्या पद्धती लिहून इंदौर पद्धतीबद्दल माहिती विशद करा. 5

ब) गेलार्डिया या फूलपिकांच्या लागवडीची माहिती लिहा. 5

क) कृषि-पर्यटन केंद्राची वैशिष्ट्ये लिहा. 5

ड) मधमाशीपालन उद्योगासाठी आवश्यक बाबी कोणत्या ते लिहा. 5

इ) शेतकरी बाजार सुरू करण्याचे उद्देश लिहा. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भारतीय अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्त्व स्पष्ट करा. 5

ब) फळे आणि भाज्यांचे टिकाऊ पदार्थ खराब होऊ नयेत म्हणून कोणती काळजी घ्यावी ते लिहा. 5

क) ज्वारीपासून पोहे तयार करण्याची प्रक्रिया सविस्तर लिहा. 5

ड) गुळाचे आहारातील औषधी महत्त्व विशद करा. 5

इ) सुकवलेल्या वनस्पतीपासून चूर्ण तयार करण्याची प्रक्रिया लिहा. 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) सुरीमी कारखाना उभारण्यासाठी जागेची निवड करतांना कोणत्या बाबी लक्षात घ्याव्यात ते लिहा. 5

ब) प्रक्रिया–उद्योग उभारणीचे फायदे लिहा. 5

क) स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा. 5

ड) उद्योगाची निवड करताना कोणत्या बाबी लक्षात ठेवाव्यात ते लिहा. 5

इ) बारकोडिंग म्हणजे काय ते लिहून त्याचे फायदे लिहा. 5